**विशेष लेख क्र. १२८**

१८ श्रावण १९२९ शके (सायं ५.३० वा.)
गुरुवार, दि. ९ ऑगस्ट २००७

# सलोखा व बंधुभाव : तंटामुक्त गाव

**महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या मातीतल्या माणसांना परस्परातला बंधुभाव, प्रेम आणि आपुलकी टिकविण्याची शिकवण संतानी दिली. संघर्ष आणि भांडण हे मनुष्याच्या व समाजाच्या प्रगतीला बाधा आणतात, एवढेच नाही तर या संघर्षातून राजघराणेसुध्दा संपल्याची उदाहरणे महाभारतात मिळतात. त्यामुळे परस्परातील संघर्ष थांबावा यासाठी `गाव` हा केंद्रबिंदू मानून ग्रामस्वराज्याचे स्वप्न पाहणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नावाने `तंटामुक्त गाव`ही योजना १५ ऑगस्ट, २००७ पासून सुरु होत आहे. त्याविषयीची माहिती देणारा हा लेख..**

लोकशाहीमध्ये लोकांना विश्वासात घेऊन त्यांच्या सहभागातून लोककल्याणकारी योजना यशस्वी होतात, हे महाराष्ट्र शासनाने संपूर्ण देशाला निर्मल ग्राम योजनेच्या रुपाने दाखवून दिले आहे. यापूर्वी शासनाने ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त गाव, निर्मल ग्राम योजना या योजना राबविल्या, त्या यशस्वी पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यशासनाच्यावतीने येत्या १५ ऑगस्ट पासून 'महात्मा गांधी तंटामुक्त गाव' मोंहीम सुरु करण्यात येत आहे.

महाराष्ट्राची लोकसंख्या ९ कोटी २८ लाख एवढी आहे. आजपर्यंत राज्यात ५ लाख खटले प्रलंबित आहेत. पूर्वी गावात तंटे सोडविण्यासाठी गावपंचायत व्यवस्था होती. हे तंटे सोडविण्याकरीता लोकसहभागातून पद्धती निर्माण व्हावी. गावात तंटे निर्माण होऊ नयेत व झालेले तंटे गावातच सोडविले जावेत, हा मुख्य उद्देश या मोहिमेचा आहे.

राज्यात विविध न्यायालयांमध्ये आजमितीस प्रलंबित तंट्याची संख्या २५ लाखांच्या आसपास आहे. दिवाणी व महसुली तंटे प्राथमिक स्तरावर निकाली होण्यासाठीच मोठा कालावधी लागतो आणि त्यानंतर अपिलाची प्रक्रिया सुरु होते. पूर्वीच्या काळी गावपातळीवर पंच कमिटी तंट्याची दखल घेऊन ते मिटविण्याचे काम करायची. त्यामुळे त्या काळात दिवाणी आणि फौजदारी स्वरुपाच्या दाव्यांची संख्या अत्यंत कमी असायची. गावांमधील तंट्याची दखल घेण्याची व निवारण्याची ती व्यवस्थाच काळाच्या ओघामध्ये लोप पावली. गावातील प्रत्येक छोट्या मोठ्या घटनांना फौजदारी स्वरुपाच्या तक्रारींचे किंवा महसुली अथवा दिवाणी दाव्याचे स्वरुप प्राप्त होत आहे आणि त्यामुळे साहजिकच न्यायालयीन यंत्रणा व पोलीस दलातील कामाचा ताण दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे, शिवाय जनतेला न्याय मिळण्यासाठी फार मोठा कालावधी प्रतिक्षेत घालवावा लागत आहे. या सर्व बाबींचा विचार करुन गावातील तंटे गाव पातळीवरच मध्यस्थांच्या माध्यमातून समझोत्याने मिटवावेत अशा प्रकारची तंटामुक्त गाव मोहीम सुरु करण्यात येत आहे. या मोहिमेस 'महात्मा गांधी तंटामुक्त गाव' मोहीम असे नांव देण्यात आले आहे.

गावातील तंटे, वाद गावपातळीवर मिटविण्यासाठी ग्रामसभेने निवडलेली सर्वसमावेशक अशा प्रकारची तंटामुक्त ग्राम समिती नेमण्यात येणार असून ग्रामसभेने निवडलेल्या व्यक्तीची अध्यक्ष म्हणून

...२/

निवड केली जाणार आहे. समितीचे निमंत्रक म्हणून पोलीस पाटील किंवा ग्रामसेवक काम पाहतील. तंटामुक्त ग्राम समितीने गावामध्ये तंटामुक्ती आणि प्रतिबंधात्मक उपाय योजनेचे काम करताना न्यायालयाची भुमिका न बजावता दोन्ही पक्षकारांमध्ये समझोता करण्याची यशस्वी भूमिका बजवायची आहे.

या योजनेचे तीन मुलभूत घटक आहेत. गावामध्ये तंटे वाद निर्माण होऊ नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, गावातील तंट्यांची यादी घरोघरी सर्वेक्षण करुन यादीतील प्रलंबित तंटे मिटविण्याचा प्रयत्न करणे, ही योजना चालू झाल्यानंतर नवनवीन प्रकारचे तंटे, वाद निर्माण होऊ शकतात आणि अशा नव्याने निर्माण होत असलेल्या तंट्यांची दखलसुध्दा समितीने घेऊन हे तंटे गांवपातळीवर मिटविण्याचा प्रयत्न करणे.

या योजनेत तंटामुक्त गाव समिती स्थापन करणे हे सर्वच ग्रामपंचायतींना बंधनकारक करण्यात आलेले आहे. १५ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या कालावधीमध्ये सर्व ग्रामपंचायतींनी ग्रामसभा आयोजित करुन तंटामुक्त ग्रामसमितीची निवड करावयाची आहे व यामध्ये सहभागी होत असल्याचा ठराव पोलीस ठाण्याला कळवावयाचा आहे.

या मोहिमेस व्यापक प्रसिद्धी देणाऱ्या पत्रकारांना रोख बक्षीस दिले जाणार आहे. जिल्हास्तरावर २५ हजार रुपये, विभागीय स्तर १ लाख रुपये आणि राज्यस्तर २.५० लाख रुपये याप्रमाणे ही बक्षिसे असतील.

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेतून भविष्यात नवी भांडणे होऊ नयेत आणि जुनी भांडणे तडजोडीने सोडविली जावीत व मानवतेचे वातावरण राज्यात निर्माण व्हावे, हा उद्देश आहे.

**शिवाजी मानकर**
उपसंचालक (माहिती)
नाशिक

००००००